R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail:dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १३

दि. २० डिसेंबर २०२५, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## दृष्टिबाधित खेळाडूंना राज्य सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, : भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीममधील खेळाडूंचा सत्कार केला. महिला खेळाडूंना त्यांच्या सरावात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात विश्र्वविजेत्या संघातील खेळांडूचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली उगले, संघाच्या कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार व महाराष्ट्राची खेळाडू गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.

या खेळाडूंनी भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल केले असून तिरंग्याचा सन्मान वाढवला आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहिला. अंतिम सामन्यात निर्णायक विजय मिळवत भारतीय मुलींनी दृष्टिबाधित क्रिकेटमधील आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे देशभर आनंदाचे वातावरण असून इतिहासात दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेटचे पहिले चॅम्पियन म्हणून भारताचे नाव कोरले गेले आहे. इतिहासात या विजयाची नोंद होईल. या यशामागे खेळाडूंनी घेतलेले अपार कष्ट, सातत्यपूर्ण सराव आणि अनेक अडचणींवर मात करण्याची जिद्द आहे. प्रत्येक खेळाडूची स्वतःची संघर्षकथा असून प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता त्यांनी सराव सुरू ठेवला. कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती हे वाक्य या संघाने प्रत्यक्षात उतरवले आहे.

संघाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अडचणी लक्षात घेऊन राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल. तसेच खेळाडूंना सरावासाठी स्वतंत्र आणि कायमस्वरूपी मैदान व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत क्रीडा आयुक्तांमार्फत चर्चा करून योग्य कार्यवाही केली जाईल. कोणतीही आर्थिक किंवा कौटुंबिक अडचण खेळातील प्रगतीस अडथळा ठरू नये, यासाठी लागेल ती मदत करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

देशात खेळ आणि खेळाडूंना मिळणारे महत्त्व वाढत आहे. पूर्वी खेळाला करिअर म्हणून कमी महत्त्व दिले जात होते; मात्र आता ही मानसिकता बदलत असल्याचे मत फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गंगा कदम महाराष्ट्राची लेक असली, तरी येथे उपस्थित असलेल्या सर्व खेळाडू भारताच्या लेकी आहेत. त्यामुळे सर्व खेळाडूंना मदतीसाठी सहकार्य करू.

या खेळाडूंनी देशाला अभिमान वाटेल असे काम केले आहे. पुढेही अशीच कामगिरी करत राहा; देश आणि राज्य सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे राहील.

**जिद्दीने विश्र्वचषक भारतात परत आणला – महंतेश**

चेअरमन महंतेश म्हणाले की, या मुलींनी केवळ भारताला अभिमान वाटावा असे काम केले नाही, तर त्याहीपलीकडे जाऊन त्यांनी समाजाला प्रेरणा दिली आहे. दीपिका आणि तिच्या संपूर्ण संघाने जिद्द दाखवत विश्र्वचषक भारतात आणला. हा विजय संपूर्ण देशाचा आहे. दृष्टिबाधित खेळाडूंसाठी महाराष्ट्रात एक कायमस्वरूपी, दिव्यांग-सुलभ जागा उपलब्ध करून दिली जावी. अशी मागणीही त्यांनी केली.

**वडिलांचे स्वप्न पूर्ण केले – उपकर्णधार गंगा कदम**

यावेळी संघाची उपकर्णधार गंगा कदम यांनी भावना व्यक्त केल्या. राज्याच्या मुख्यमंत्री यांना भेटण्याची संधी मिळाल्यामुळे संपूर्ण संघाचा आत्मविश्र्वास वाढल्याचे सांगून ती म्हणाली की, मी मुख्यमंत्री महोदयांना भेटले होते. आज संपूर्ण टीम माझ्यासोबत आली आहे, हे पाहून खूप समाधान वाटते. माझ्या वडिलांची इच्छा होती की मी खेळात पुढे जावं. नियमित सराव करत असताना अचानक माझ्या वडिलांचे निधन झाले. त्या दुःखातून सावरायला मला वेळ लागला. त्यावेळी आता खेळ सोड, शिक्षण करून काहीतरी वेगळं कर असे अनेकांनी सांगितले. पण मला माहीत होतं की माझ्या वडिलांचं स्वप्न काय होतं. वडिलांच्या निधनानंतर १३ दिवसांनी मी पुन्हा सरावाला सुरुवात केली. तो निर्णय माझ्या आयुष्यातला सगळ्यात कठीण पण सगळ्यात महत्त्वाचा होता, असे सांगताना ती भावूक झाली.

२०१७ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून पहिल्यांदा दृष्टिबाधित मुलींसाठी क्रिकेटची संधी मिळाली. तेव्हाच मला कळलं की आपल्यालाही संधी मिळाली तर आपण देशासाठी खेळू शकतो. अनेक अडचणी आल्या तरी आम्ही सराव थांबवला नाही. कारण खेळ आमच्यासाठी फक्त छंद नाही, तो आमचा आत्मसन्मान आहे. जर सरावासाठी योग्य मैदान, सुविधा आणि आर्थिक आधार मिळाला, तर आम्ही आणखी चांगली कामगिरी करू शकतो. महाराष्ट्र आणि देशासाठी अधिक पदकं जिंकू शकतो, अशा शब्दांत तिने भावना मांडल्या.

**आम्ही मेहनत करू, शासन पाठिशी रहावे – कर्णधार दीपिका**

संघाची कर्णधार कु. दीपिका म्हणाली की, आम्ही केवळ स्वतःपुरते नव्हे, तर आमच्या कुटुंबासाठीही पूर्ण जबाबदारीने उभे राहतो. घरखर्च, उपचार, शिक्षण आणि सराव या सगळ्यांची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे नियमित आर्थिक सहाय्य मिळणे आमच्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. आमच्या संघातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य देण्यात यावे. काही खेळाडूंना निवासाची सोय उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आम्ही मेहनत करण्यास तयार आहोत. फक्त आधार आणि संधीची गरज आहे. सरकार आमच्या पाठीशी उभे राहील, हीच अपेक्षा आहे.

यावेळी क्रीडा आयुक्त श्रीमती तेली-उगले यांनी प्रास्ताविकात दृष्टिबाधित खेळाडूंनी दाखविलेल्या दुर्दम्य इच्छाशक्ती व मेहनतीचा उल्लेख करून या खेळाडूंचा अभिमान असल्याचे सांगितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रसार - राजदूत विशाल शर्मा



मुंबई, : पॅरिस येथील युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतिहासात प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोमध्ये स्थापित करण्यात आल्याने या घटनेला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जगभरातील नागरिकांना डॉ. आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाची तसेच शिक्षण, मानवाधिकार आणि सामाजिक समतेच्या मूल्यांची ओळख करून देणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे युनेस्को, पॅरिस येथील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांनी सांगितले.

राजदूत विशाल शर्मा यांनी दादर येथील चैत्यभूमीला भेट देऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते.

राजदूत विशाल शर्मा म्हणाले, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त पुढाकारातून साकार झालेल्या या निर्णयामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतिहासात प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोमध्ये स्थापित झाला आहे. शिक्षणालाच प्रगतीचे मुख्य साधन मानणाऱ्या डॉ. आंबेडकर यांचे जीवन आजच्या युवकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माझ्यासाठी बालपणापासून आदर्श आहेत. शिक्षणाच्या जोरावर यश मिळवण्याचा मार्ग बाबासाहेबांनी दाखवला असून, जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन शिक्षण घेण्याची प्रेरणा त्यांनी समाजाला दिली. बाबासाहेबांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी युवकांना केले.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राजदूत विशाल शर्मा म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोला भेट स्वरूपात देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाच्या सहकार्यामुळे शक्य झाला. राजदूत विशाल शर्मा यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अपर मुख्य सचिव विकास खारगे तसेच महाराष्ट्र शासनाचे यावेळी आभार मानले.

## राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी उद्या मतदान

मुंबई: राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्यपदांसाठी; तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १४३ सदस्यपदांच्या जागांसाठी शनिवार २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर केला होता. त्यानुसार २ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले. उर्वरित ठिकाणी उद्या मतदान होणार आहे. सर्व संबंधित ठिकाणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होईल.

## वाशी सुविधा केंद्रातून हंगामातील डाळिंबाचा पहिला कंटेनर समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना - पणन मंत्री जयकुमार रावल



मुंबई : महाराष्ट्रात उत्पादित डाळिंबाचा हंगामातील पहिला कंटेनर मुंबईतील जेएनपीटी बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना करण्यात आला आहे. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरून हा कंटेनर रवाना करण्यात आला असून राज्यातील फळनिर्यातीच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

अमेरिका - भारत कृषी-निर्यातविषयक घडणाऱ्या घडामोडींच्या पार्श्र्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये उच्चस्तरीय चर्चा सुरू आहेत. अशा परिस्थितीत डाळिंबाचा पहिला कंटेनर रवाना होणे हे भारताची विश्र्वासार्हता, गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगततेचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.

जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील उत्पादित होणाऱ्या फळे, भाजीपाला आणि इतर शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आंबे, डाळिंब इतर फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळावे, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ आणि केंद्र शासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेसाठी जेएनपीटी बंदरातून हंगामातील पहिला डाळिंब कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात क्षमतेसाठी तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार आहेत.

भारतीय डाळिंबांचा अमेरिकन बाजारपेठेतील वाटा वाढल्यास राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचेही पणन मंत्री रावल यांनी नमूद केले. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा, एनपीपीओ व निर्यातदार अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सातत्याने तांत्रिक व धोरणात्मक पातळीवर कार्यरत आहेत.

डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार २०१७-१८ मध्ये काही तांत्रिक कारणामुळे अमेरिकेला भारतातून डाळिंब निर्यात बंद झाली होती. परिणामी जवळपास सहा वर्षे भारतीय डाळिंब अमेरिकन बाजारपेठेत पोहोचू शकला नव्हता. निर्यात पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाच्या अपेडा व राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी (यू. एस.डी.ए.) तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर सातत्याने चर्चा करून कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावर आवश्यक चाचण्या घेऊन अहवाल सादर केले. पॅक-हाऊसमध्ये डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आली. त्यानंतर यू.एस.डी.ए. व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणीनंतर विकिरण प्रक्रिया पार पाडण्यात आली. ४,८०० बॉक्सेसमधून १७,६१६ किलो (सुमारे १७.६ मेट्रिक टन) डाळिंब निर्यात करण्यात आली आहे.

सन २०२४ मध्ये अमेरिकेने निर्यातीसाठी काही शास्त्रीय निकष लागू केले आहेत. यामध्ये माईट वॉश प्रोटोकॉल, सोडियम हायपोक्लोराईडद्वारे निर्जंतुकीकरण तसेच वॉशिंग व ड्रायिंग प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच डाळिंबाचे चार किलो क्षमतेच्या प्रमाणित बॉक्समध्ये पॅकेजिंग करून अधिकृत विकिरण सुविधा केंद्रात विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे. या सर्व प्रक्रिया यूएसडीए व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणी व मान्यतेनंतरच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या प्रसंगी यूएसडीए निरीक्षक रॉबर्टो रिवाझ, एनपीपीओचे डॉ. बी.एल. मिना, कृषी पणन मंडळाचे विभाग प्रमुख अनिमेष पाटील, अपेडाचे बामणे तसेच संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

३०० मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी यावेळी चालू २०२५-२६ हंगामात अमेरिकेस सुमारे ३०० मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली. अमेरिकेतील बाजारपेठेत डाळिंबाची मागणी झपाट्याने वाढत असून, तेथील डाळिंब बाजारपेठ सध्या अंदाजे १.२ ते १.५ अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे. विशेषतः भारतीय 'भगवा' व 'सुपर भगवा' जातींना चव, रंग व साखर-आम्ल संतुलनामुळे अधिक मागणी आहे.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# बीडमध्ये विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम संपन्न

बीड/प्रतिनिधी-रात्रीच्या वेळी वाहनांची दृश्यता





वाढून अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, या महत्त्वपूर्ण उद्देशाने विश्र्वगती मोटर मालक-चालक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने वाहन सुरक्षेसाठी वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून

बीड जिल्हा वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक सानप साहेब, पाडळसिंगी महामार्ग पोलीस, मांजरसुंबा महामार्ग पोलीस उपनिरीक्षक ढगे साहेब, तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) गावडे साहेब यांच्या उपस्थित

घेण्यात आला.

रात्रीच्या वेळी अनेक वेळा जड व मालवाहू वाहनांची योग्य दृश्यता नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. ही बाब लक्षात घेऊन वाहनांच्या मागील व बाजूच्या भागावर रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम विश्र्वगती मोटर मालक-चालक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून घेण्यात आला. वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावल्यामुळे दूरवरूनच वाहन स्पष्ट दिसून येत असून इतर वाहनचालकांना वेळीच अंदाज येण्यास मदत होते. परिणामी अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होण्यास हातभार लागणार आहे. या कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी वाहन चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत वाहनांवर आवश्यक सुरक्षात्मक साधने वापरण्याचे महत्त्व विशद केले. तसेच यावेळी अनेक वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर बसविण्यात आले. या सामाजिक व उपयुक्त उपक्रमाबद्दल उपस्थित वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासन व सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून असे उपक्रम सातत्याने राबविले गेल्यास रस्ते अपघातांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असा विश्र्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाप्रसंगी ट्रान्सपोर्ट धारक, वाहन मालक व चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येवता येथे पाण्याची मोटर चालू करण्यावरून पुतण्या चुलत्याची भांडणे, उचलल्या कुर्हाडी;चार जणांविरुद्ध केज पोलिसांत गुन्हा दाखल




केज/प्रतिनिधी- विहिरीवरील पाण्याची मोटर चालू करण्यावरून पुतण्या चुलत्याची भांडणे झाल्याच्या घटनेवरून केज पोलीस ठाण्यात चुलत्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील येवता येथील प्रणव अशोक सक्राते वय २२ वर्षे हे दिनांक १७ डिसेंबर रोजी स.नं.१४१ मधील विहिरीवर पाण्याची मोटर चालू करण्यासाठी गेले असता प्रणव यांचे चुलते मल्हारी लक्ष्मण सक्राते, त्यांचा मुलगा दीपक मल्हारी सक्राते, प्रवीण मल्हारी सक्राते व शारदा मल्हारी संक्राते हे सर्वजण विहिरीवर आले व प्रणव सक्राते यांना म्हणाले की, व्हेरी वरची मोटर चालू करू नकोस विहीर व पाण्याची मोटर आमची आहे असे म्हणून शिवीगाळ करण्यास सुरू केली.

प्रणव सक्राते यांना चापटा बुक्क्यांनी मारहाण केली त्यांचे चुलते मल्हारी संक्राती यांनी हातातील कत्तीने प्रणवच्या उजव्या हातावर मारले असता प्रणव यास जखम झाली व रक्त निघू लागले तेव्हा इतर सर्वांनी प्रणव यास हातात दगड घेऊन मुक्का मार दिला. यापुढे तू किंवा तुझ्या घरच्यांनी विहिरीपाशी पाऊल ठेवला तर तुम्हाला जीवे मारून टाकू अशी जीवे मारण्याची धमकी दिली. भांडणाचा आवाज ऐकून अशोक देवराव साखरे यांनी येऊन त्यांच्या भांडणाची सोडवा सोडवा केली. प्रणव चे वडील अशोक लक्ष्मण सक्राते हे घरी आले व त्यांनी प्रणवला गाडीवर बसून केज पोलीस स्टेशन येथे घेऊन आले व केज पोलिसांनी उपचार कामी पत्रक देऊन प्रणव सक्राते यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. रुग्णालयात उपचार घेऊन प्रणव सक्राते हे केज पोलीस ठाणे येथे हजर होऊन मल्हारी लक्ष्मण सक्राते, दीपक मल्हारी सक्राते, प्रवीण मल्हारी सक्राते, शारदा मल्हारी सक्राते यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. हनुमान मुंडे हे करत आहेत.

# 'ऋषभायन-२' वैश्र्विक सांस्कृतिक आणि वैदिक ज्ञान महोत्सव व 'वृषभ कला' प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन





मुंबई : ज्ञान, साधना, सुरक्षा आणि कृषी याबाबत महत्त्वपूर्ण विचारांद्वारे साहित्य, कला, संस्कृती आणि सभ्यता प्रगल्भ करणारा असी, मसी और कृषी चा जीवनमार्ग भगवान वृषभदेव यांनी दाखविला. जगाच्या कल्याणासाठी हे विचार व ज्ञान येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश असून भारताच्या प्राचीन व महान संस्कृतीचे प्रतीक म्हणजे ऋषभदेवांचे विचार आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बोरिवली येथे ऋषभायन - २ या तीन दिवसीय वैश्र्विक सांस्कृतिक आणि वैदिक ज्ञान महोत्सव प्रसंगी बोलत होते. यावेळी राज्याचे कौशल्य विकास, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार संजय उपाध्याय, आमदार मनीषा चौधरी, माजी खासदार गोपाळ शेट्टी, एल.पी. सिंह, श्री ललित गांधी तसेच जैन मुनी, शिख, बौद्ध आणि हिंदू धर्मगुरू देखील यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिले तीर्थंकर, पहिले सम्राट, भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे प्रतिक भगवान ऋषभदेव आहेत. जगाला 'संस्कृती' या संकल्पनेची ओळखही नसताना भारत पूर्ण विकसित सांस्कृतिक अवस्थेत होता, भगवान ऋषभदेव यांनी देशाच्या संस्कृतीसाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. मानवजातीला जीवनाचा मार्ग, साहित्य, कला, संस्कृती, अध्यात्म, ज्ञान, शेती, सुरक्षा, प्रेम, आनंद आणि अनंततेची संकल्पना दिली. ऋषभदेव केवळ एका धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर त्यांनी मानवी संस्कृतीचा पाया रचला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भगवान ऋषभदेवांनी पुरुषांसाठी ७२ कला आणि महिलांसाठी ६४ कलांचे विवेचन केले असून, वास्तुकला, धातुकाम, उत्पादन असे ते होते. वैविध्यपूर्ण जीवनपद्धतींचे त्या कलांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमातून घडत आहे. देश, संस्कृती, अभिमान आणि स्वाभिमान यांसाठी हे कार्य अद्वितीय व अत्यंत मोलाचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी जैन, बौद्ध, सनातन, शीख आदी विविध परंपरांचे वाहक एकत्र आले असून, सर्वांनी एकत्रितपणे भगवान ऋषभदेवांच्या विचारांना वंदन केले. सर्व संत, ऋषी, महंत, साध्वी आणि भिक्षू यांची एकाच व्यासपीठावर उपस्थिती ही भारतीय ज्ञान प्रणाली भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेषतः जैन संतांनी ध्यान, साधना आणि लोककल्याणाच्या भावनेतून आपले विचार समाजापर्यंत पोहोचवले असून, ते मानवतेसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केले.

भगवान ऋषभदेवांचे विचार जगासमोर मांडण्यासाठी जागा उपलब्ध करून देणार

भगवान ऋषभदेवांसाठी एक जागतिक दर्जाचे, योग्य व समर्पित स्थान निर्माण करण्याबाबत चर्चा करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले ज्ञान, कला, आणि सांस्कृतिक मूल्ये एकत्रितपणे जगासमोर मांडण्यासाठी शासनाच्या वतीने जागा देण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. जैन मुनी यांनी या कार्यासाठी येथे जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी केली होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैन मुनी श्रीमद्. विजय यशोवर्मसुरीश्र्वरजी महाराज यांनी केले.

'वृषभ कला' प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

'वृषभ कला' या दालन व प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. 'भारतीय संस्कृती' चे पुरोधा राजा भगवान ऋषभ यांच्या वरील कला दालनाद्वारे ऋषभदेव यांनी केलेल्या कार्याचा त्यांच्या विचारांचा परिचय दिला जात आहे.

ऋषभायन-२ या आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्ताने 'ऋषभयन' या संकल्पनेतून साकार झालेल्या ११११ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. हे सर्व ग्रंथ सखोल संशोधनावर आधारित असून त्यांची संख्या १,४०० पर्यंत पोहोचणार आहे.

यावेळी भगवान ऋषभ यांच्या जीवनावर आधारित पुस्तिका तयार करण्यात आली असून, ती येत्या दोन-तीन दिवसांत सुमारे एक लाख नागरिकांपर्यंत वितरित केली जाणार आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# भले ही असतील देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र पण आता फक्त नवी मुंबईत वीरेंद्र..!

नवी मुंबई / के. एच हनवते :-१६ डिसेंबर हा वीरेंद्र भाऊ लगाडे यांचा वाढदिवस होता व १७ डिसेंबरला नवी मुंबईच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होत्या १७ डिसेंबरला आम्ही नवी मुंबई रिपब्लिक सेनेचे सर्व टीम दादर मुंबई येथील पक्षाचे केंद्रीय कार्यालय आंबेडकर भवन या ठिकाणी मुलाखतीसाठी गेलो असताना साहेबाला भेटताक्षणीच साहेबांनी सांगितले की तुमचा वाढदिवस आपण ऑफिसमध्ये साजरा करूया मी म्हणालो साहेब वाढदिवस कालच साजरा केला तरीसुद्धा साहेबांनी स्वतः केकची ऑर्डर देऊन माझा वाढदिवस त्यांच्या केबिनमध्ये त्यांच्या हस्ते त्यांच्या उपस्थितीत मोठ्या जोशामध्ये जल्लोषामध्ये साजरा केला, म्हणूनच सर सेनानी आनंदराज आंबेडकर साहेब हे आम्हाला आपले वाटतात त्यांचा प्रत्येक कार्यकर्त्यांच्या सुखदुःखामध्ये जो सहभाग असतो अशा कुठल्याही नेत्यांचा नसतो कार्यकर्त्यांवर प्रेम किंवा आपुलकी आतापर्यंत कुठल्याही इतर नेत्यांमध्ये बघण्यात आलेली नाही आणि त्याचमुळे आज महाराष्ट्रामध्ये लाखोच्या संख्येने कार्यकर्ते त्यांच्या



सानिध्यामध्ये येत आहेत व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून महाराष्ट्राचे युवा नेते ॲड. अमन आंबेडकर हे सुद्धा कार्यकर्त्यांमध्ये एकरूप समरस होऊन कार्यकर्त्यांबरोबर आपुलकीचे वागत आहेत त्यामुळे ही हे कुटुंब आम्हाला आमच्या कुटुंबीयाप्रमाणेच वाटते. आणि आता भविष्यामध्ये आंबेडकरी समाजाला सर सेनानी आनंदराज आंबेडकर व युवा नेते ॲड. अमन आंबेडकर यांच्याशिवाय पर्याय राहिलेला नाही आपण त्यांना साथ देऊया ते आपल्याला सत्ता देतील. जोपर्यंत आपण सत्तेत जात नाही तोपर्यंत आपल्याला न्याय मिळणार नाही आपल्या समाजाला न्याय मिळवायचा असेल तर सर्व समाजाने सर सेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या पाठीखंबीरपणे उभे राहिले पाहिजे. साहेब पुन्हा एकदा तुमचे कोटी कोटी धन्यवाद तुम्ही माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याचा वाढदिवस एवढ्या उत्साहात साजरा केला त्याबद्दल क्रांतिकारी जय भीम..! नवी मुंबई जिल्हाध्यक्ष वीरेंद्र लगाडे.

# जात वैधता पडताळणीसाठी मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना

लातूर/प्रतिनिधी :लातूर मनपा सार्वत्रिक निवडणुकीत जात वैधता करण्यासाठी अर्ज स्वीकारून ते अर्ज जात पडताळणी समितीकडे पाठवण्यासाठी लातूर मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

मनपाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार आयोगाने निश्र्चित केलेल्या आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारंचे जात वैधता करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी अर्ज करावा लागतो.असे अर्ज स्वीकारून ते जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात हा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून दि.२२ डिसेंबर ते ३० डिसेंबर या काळात अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. हे अर्ज जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविले जाणार आहेत.

आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज या कक्षाकडे आवश्यक कागदपत्रांसह संतोष लाडलापुरे व फजल शेख यांचेकडे सादर करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री क्षेत्र उत्तरकाशी, ऋषिकेश, हरिद्वार येथील कार्यक्रमात समाजभूषण उत्तम तरकसे यांचे प्रतिपादन

उत्तराखंड (हरिद्वार) :- समाजभूषण उत्तमराव तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे काही शासकीय कामानिमित्त पंजाब चंदीगड हरियाणा राज्यातील माण सा,संघारूल,पटीयाला,फतेहगड,साहेबजादा,अमर सह नगर, दिंडीगड जिल्ह्यातील शासकीय कामकाज पार पाडत चंदीगड,पानिपत, कुरुक्षेत्र जिल्ह्याच्या परिसरात आलो असताना हरिद्वारचे रहिवासी असलेले अमरीश महाराज व मनीष भारद्वाज तसेच काही हरिद्वार भक्तगणांन समाजभूषण उत्तमराव तरकसे हे काही शासकीय कामानिमित्त उत्तराखंड हरिद्वारच्या जवळ असल्याचे समजल्याने अमरीश महाराजांनी समाजभूषण उत्तमराव तरकसे यांना गंगा आरती करिता हरिद्वार (हरकीपुडी) येथे येण्याचे आग्रहाचे



निमंत्रण केल्याने समाजभूषण उत्तमराव तरकसे हरिद्वार (हरकीपुडी) येथे अमरीश महाराज व मनीष भारद्वाज तसेच भक्तगणा समावेत गंगाआरतीत सहभागी होऊन समस्त हरिद्वार भक्तगणांच्या आग्रा खातर

जग कधीही बदलू शकते, पण ..
आपले कर्म कधी बदलत नाही..!
ते नेहमी आपले फळ कर्मदात्याला देतेच
मग ते कर्म चांगले असो का वाईट..!!

असे प्रबोधनात्मक विचार मांडत सदर कार्यक्रमास बोलवल्याबद्दल अमरीश महाराज आणि मनीष भारद्वाज व सर्व हरिद्वार भक्तांचे आभार मानले तसेच पंजाब आणि सिंध प्रांत मेंन हरिद्वार, मानसी माता मंदिर तसेच भारत माता मंदिरास भक्तगणासमवेत भेट देऊन पाहणी केली व पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानत शासकीय कामकाजाकरिता निघून गेले.

# रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

केज/प्रतिनिधी-शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल दि. दि १४ डिसेंबर ते १७ तीन दिवशीय सहल भीमाशंकर,लेण्याद्री, ओझर,शिवनेरी,नाशिक त्रिंबकेश्र्वर, भंडारदरा, कळसुबाई,शिर्डी, शनिशिंगणापूर,मोहटा देवी आदी ठिकाणी भेटी देऊन संपूर्ण झाली यादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध स्थळाबद्दल भौगोलिक ऐतिहासिक माहिती देऊन त्यांच्या अभ्यासक्रमा इतर उपक्रमात भर घातली.



सहलीमध्ये मुलांनी ऐतिहासिक,भौगोलिक, नौकानयन, धार्मिक- सांस्कृतिक स्थळी निसर्गाच्या सानिध्यामध्ये विद्यार्थ्यांना अनुभूती मिळाली विद्यार्थ्यांनी स्थानिक खाद्य पदार्थांचा येथेच्छ लाभ घेतला. या सहलीसाठी राज्य परिवहन मंडळाने लालपरी बसमधून प्रवास झाला एसटी चालक श्री थोरात यांनी सुरक्षित पद्धतीने गाडी चालवली.

सहलीच्या नियोजनामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री खोसे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सहल यशस्वी करण्यासाठी श्री गोरे,श्री देशमुख,श्री देवकते,श्री टोपे,श्री कळेकर,श्री नाईकनवरे, श्री शिंपले यांनी परिश्रम घेतले.

# संपादक बालासाहेब फपाळ यांचे मायेचे छत्र हरपले

प्रतिनिधी/माजलगाव-माजलगाव तालुक्यातील बेलोरा येथील मूळ रहिवासी व सध्या तेलगाव येथे वास्तव्यास असलेले साप्ताहिक जन्सामान्याचा विकासनामा या वृत्तपत्राचे संपादक मा. बालासाहेब दामोधर फपाळ यांच्या मातोश्री मंदिराबाई दामोधर फपाळ वय ७५ वर्षे यांचे वृद्धापकाळाने गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १-०० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर शोककळा पसरली असून संपादक बालासाहेब फपाळ यांचे मायेचे छत्र हरपले आहे.



मंदिराबाई फपाळ या स्वभावाने अतिशय शांत, मनमिळावू, कष्टाळू आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी त्या आधारस्तंभ होत्या. कुटुंब, नातेसंबंध आणि समाज यांना एकत्र बांधून ठेवणारी त्यांची भूमिका सर्वश्रुत होती. त्यांच्या संस्कारामुळेच फपाळ कुटुंबात मूल्याधिष्ठित विचार, सेवाभाव आणि सामाजिक जाणिवा रुजल्या असल्याचे कुटुंबीय व आप्तस्वकीय आवर्जून सांगतात.

संपादक बालासाहेब फपाळ यांनी आपल्या मातोश्रींची सेवा अत्यंत प्रेमाने व जबाबदारीने केली. त्यांच्या आजारपणातही त्यांनी कोणतीही कमी पडू दिली नाही. आई-मुलातील जिव्हाळ्याचे नाते परिसरात परिचित होते. मात्र काळाच्या नियमानुसार मंदिराबाई फपाळ यांचे निधन झाले आणि बालासाहेब फपाळ यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. त्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, ग्रामस्थ व नातेवाईकांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

मंदिराबाई फपाळ यांच्या पश्र्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कुटुंबात निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी व अंत्यविधीसाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, माती सावडण्याचा कार्यक्रम शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता, आलापूर येथील त्यांच्या शेतात पाण्याच्या टाकीजवळ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन फपाळ कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

मंदिराबाई दामोधर फपाळ यांच्या निधनाने एक कर्तव्यदक्ष माता, प्रेमळ आजी आणि संस्कारक्षम गृहिणी काळाच्या पडद्याआड गेल्या असून त्यांचे स्मरण कायम राहील, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात मुलींसाठी समुपदेशन सेमिनार




लातूर : दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,लातूर व सखी सावित्री समिती,आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ डिसेंबर २०२५ रोजी इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थीनींसाठी ' मुलींचे वयोमानानुसार होणारे शारीरिक व मानसिक बदल समुपदेशन सेमिनार ' आयोजित करण्यात आलेला होता.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर यांचेही सहकार्य लाभले.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, प्रमुख मार्गदर्शक बिर्ला समूहाच्या स्मितल भागवत आणि प्रा.कविता जाधव,डॉ. कोमल गोमारे,प्रा.वैष्णवी जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी किशोरी गटातील मुलींना ' मुलींचे वयोमानानुसार होणारे शारीरिक बदल, शारीरिक व मानसिक समस्या आणि मनातील शंका कुशंका, विविध प्रश्र्न' या विषयावर बिर्ला समूहाच्या स्मितल भागवत यांनी समुपदेशन व मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे यांनी केले.प्रास्ताविक डॉ.कोमल गोमारे यांनी केले तर आभार प्रा.कविता जाधव यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.वैष्णवी जोशी यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व अकरावी व बारावीच्या विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# दुसऱ्या अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवाचा समारोप

## 'ब्रम्हकमळ' सर्वोत्कृष्ट लघुपट - 'सुलतान' व 'डिअर टीचर' ला अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय पारितोषिक.

लातूर : अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या अभिजात इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा पारितोषिक वितरण सोहळा प्रसिद्ध लेखक व कवी बालाजी सुतार यांच्या हस्ते पार पडला.




वृद्धापकाळातील एका स्त्रीची भावनिक व तरल कथा असलेल्या 'ब्रह्मकमळ' या लघुपटास चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने दिला जाणारा सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच लघुपटाचे दिग्दर्शक आशुतोष जरे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचाही पुरस्कार मिळाला. 'सुलतान' आणि 'डिअर टीचर' या लघुपटांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले. 'इन हाफ' या कलाकृतीस सर्वोत्तम ऍनिमेशनपटाचा पुरस्कार देण्यात आला तर 'वूमन ऑन फायर' या माहितीपटास सर्वोत्कृष्ट माहितीपट म्हणून गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या लेखक बालाजी सुतार यांनी लघुपटातून मांडल्या जाणाऱ्या गोष्टीला अधिक महत्व असल्याचे अधोरेखित करत कुठल्याही व्यावसायिक अपेक्षांचं ओझं नसलेलं लघुपट हे अतिशय नेमकं, प्रखर आणि गरजेचं माध्यम आहे असं मत व्यक्त केलं. तत्पूर्वी लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी महोत्सवास सदिच्छा भेट देत असताना लघुपट माध्यमातल्या कलात्मक दृष्टीकोनाबद्दल उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधला. विविध विषयावर संवाद साधण्यासाठी लघुपट हे अतिशय वेगवान आणि परिणामकारक माध्यम आहे हे सांगताना भविष्यात हा महोत्सव अजून मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सुमारे १२ देशातून आलेल्या १९ भाषांमधल्या निवडक १०० लघुपटांचे प्रदर्शन या महोत्सवात झाले. परिक्षक म्हणून ठाणे येथील संतोष पाठारे आणि नवी मुंबई येथील निलेश कुंजीर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमास डॉ. मिलिंद पोतदार, प्रा. ओमप्रकाश झुरळे यांच्यासह अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, डॉ. विश्र्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख, धनंजय कुलकर्णी, प्रा शिवशंकर पटवारी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तीन दिवस मेहनत घेणाऱ्या दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजात फिल्म सोसायटीचे मधुसूदन कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ दुर्गा शर्मा यांनी केले.

इतर विभागातले पुरस्कार याप्रमाणे आहेत : सर्वोत्कृष्ट व्हिडीओ साँग कोलकतार पोरी (प्रथम), माझ्या गणा (द्वितीय). सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय लघुपट क्रेस्ट.

सर्वोत्कृष्ट स्थानिक लघुपट : भुताचं पत्र, सर्वोत्कृष्ट स्थानिक माहितीपट योगेश्र्वरी देवी, सर्वोत्कृष्ट स्टुडन्ट लघुपट एक्स एल १००, ज्यूरी अवॉर्ड दि फर्स्ट फिल्म, सिलेक्टर चॉईस सोच, ऑडियन्स चॉईस डिसकनेक्टेड, सर्वोत्कृष्ट अभिनेता कृष्णा यादव (उन्मेय), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री सुजाता देशपांडे (निरोप), सर्वोत्कृष्ट बालकलाकार सार्थक मसने (व्हॉइस ऑफ ओल्ड, ) सर्वोत्कृष्ट छायाचित्रण ह्रदय सोनवणे (ब्रम्हकमळ,) सर्वोत्कृष्ट संकलन राम पंडियन (सी यू टूमॉरो), सर्वोत्कृष्ट संवाद

मानसी मोरे, ओंकार मसुरकर, दुर्वा सावंत (ऑटोप्सी), सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन अतुल लोखंडे (सुलतान), सर्वोत्कृष्ट माहितीपट (पर्यावरण) गटली मॅन, सर्वोत्कृष्ट पार्श्र्वसंगीत अनिश बसु ( दि अल्टर इको), सर्वोत्कृष्ट पटकथा केविन बी. (लंचबॉक्स), सर्वोत्कृष्ट सामाजिक लघुपट के. इनफ्लूवन्सर, सर्वोत्कृष्ट पोस्टर डिजाईन सुनीत वडके (द्वैत).

# बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांसाठी 'दिशा' अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी बंधनकारक - सचिव तुकाराम मुंढे

मुंबई, : बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुणवत्ता, एकसमानता आणि सातत्य आणण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील विशेष शाळांमधील बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या 'दिशा' विशेष अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व बौद्धिक अक्षम प्रवर्गाच्या विशेष शाळांमध्ये दिशा पोर्टल, अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रणाली राबविणे बंधनकारक असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, सर्व विशेष शाळांना 'दिशा' पोर्टलवर ऑनबोर्ड करणे, मुख्याध्यापक व शिक्षकांचे प्रशिक्षण, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम (आयईपी) व वैयक्तिक थेरपी कार्यक्रम (आयटीपी) तयार करणे, बहुसंवेदी अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे तसेच नियमित मूल्यमापन व पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुंबई शहर, उपनगरचे जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे .

या निर्णयामुळे राज्यातील बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुणवत्ता, एकसमानता व सातत्य निर्माण होऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. दिशा अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या शाळांना दिशा अंमलबजावणी करणाऱ्या शाळा म्हणून प्रमाणन देण्यात येणार आहे. निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांवर अनुदान थांबविणे किंवा संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांना दिशा अभ्यासक्रमाची पुस्तके, कार्यपुस्तिका व शिक्षक पुस्तिकांच्या मुद्रित प्रती उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, सर्व बौद्धिक अक्षम विशेष शाळांचा दिशा अभियानात पूर्ण सहभाग अनिवार्य करण्यात आला आहे. मुख्याध्यापक व दिशा समन्वयक यांच्या बैठका, ऑनलाइन व प्रत्यक्ष प्रशिक्षण, वार्षिक दिशा कॅलेंडर आणि दिशा अंमलबजावणी शाळा संकल्पना राबविण्यावर भर देण्यात आला आहे. विशेष शाळांच्या नूतनीकरण प्रस्तावांमध्ये दिशा अभियानाची अंमलबजावणी नमूद करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन वर्षातून दोन वेळा करण्यात येणार असून, मध्य सत्र व अंतिम सत्रात सविस्तर मूल्यांकन करून त्याचा अहवाल पालकांना दिला जाणार आहे. 'दिशा' अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या शाळांना दिशा अंमलबजावणी करणाऱ्या शाळा म्हणून प्रमाणपत्र देण्यात येणार असून, निर्धारित निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांवर

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी शाळांना नोंदणी करण्याचे आवाहन

मुंबई, : राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) या प्रवर्गातील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने महाडीबीटी प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहेत. या अनुषंगाने मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळांनी महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक नोंदणी व माहिती अद्ययावत करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक मुंबई शहर रविकिरण पाटील यांनी केले आहे.

या योजनेसाठी शाळा स्तरावर मुख्याध्यापकांनी महाडीबीटी पोर्टलवरील https://prematric.mahait.org/Login/Login लॉगिनद्वारे शाळेची नोंदणी करणे आवश्यक आहे. प्री-मॅट्रिक योजनांसाठी अर्ज नोंदणी करताना मुख्याध्यापकांनी PrešSE27XXXXXXXXXšPrincipal हा युजर आयडी व झरीी१२३ हा पासवर्ड वापरून लॉगिन करावे. त्यानंतर शाळेचे प्रोफाइल, मुख्याध्यापक व लिपिकांची माहिती तसेच विद्यार्थ्यांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती अद्ययावत करावी. विद्यार्थी ज्या योजनेसाठी पात्र आहेत, त्या संबंधित शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्ज प्रक्रियेदरम्यान काही अडचणी उद्भवल्यास संबंधितांनी लेखी स्वरूपात कळवावे अथवा astdirmumcityvintgmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी मुख्याध्यापक व शाळा कर्मचारी यांनी विद्यार्थी व पालकांना योग्य मार्गदर्शन करून अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यास सहकार्य करावे. एकही पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा भरारी पथकांची स्थापना करावी - राज्य निवडणूक आयुक्त

मुंबई : महानगरपालिका निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्याकरिता आणि आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशा भरारी पथकांची स्थापना करावी. त्याचबरोबर सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये सुसज्ज ठेवावीत आणि मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे, यादृष्टीने आतापासूनच काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्दे श राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रियेच्या तयारीसंदर्भात सर्व महानगरपालिका आयुक्तांची आज दूरचित्र संवादाच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.

दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, भरारी पथकांच्या माध्यमांतून आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी महानगरपालिका आयुक्तांनी पुरेशा मनुष्यबळाची व्यवस्था करावी; तसेच कायदा व सुव्यवस्था चोख राखण्यासाठी पोलीस यंत्रणेसोबत समन्वय साधावा. त्याचबरोबर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित प्रभागांचे नकाशे, प्रभागातील जागानिहाय आरक्षण, नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचे नमुने, इतर आवश्यक अधिकारी/ कर्मचारी, आवश्यक साहित्य इत्यादींची त्वरित व्यवस्था करण्यात यावी. मतदारांना सहज व सुलभरित्या मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्रांवर किमान सेवा-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शक्य असलेल्या ठिकाणी आदर्श मतदान केंद्रे किंवा पिंक मतदान केंद्रांची उभारणी करावी. सचिव काकाणी यांनी बैठकीत सादरीकरण केले. महानगरपालिकेसंदर्भातील अधिनियम व राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश यासंदर्भात त्यांनी तपशीलवार माहिती दिली. ते म्हणाले की, उमेदवारांच्या यादीतील आणि मतपत्रिकांवरील उमेदवारांच्या नावांचा क्रम राज्य शासनाने महानगरपालिका निवडणूक नियमात केलेल्या सुधारणेनुसार लावावा. निवडणूक चिन्ह वाटपासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या ५ मे २०२५ रोजीच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे. या सर्व निवडणूक प्रक्रियेसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, याकरिता महानगरपालिका आयुक्त यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १0, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.